# ।। सुरगुण निरगुण को अंग ।।
# मारवाडी + मराठी
✻

महत्वाची सुचना:- रामद्वारा जळगांव यांचे असे निदर्शनास आले आहे की,काही रामस्नेही शेठ साहेब राधाकिसनजी महाराज व जे.टी.चांडक यांनी अर्थ केलेल्या वाणीजी रामद्वारा जळगांव मधून घेऊन जातात व आपल्या वाणीजीचा गुरु महाराज सांगतात तसा पुर्ण आधार न घेता आपल्या मताने समजने,अर्थामध्ये परस्पर बदल करुन टाकतात तरी वाणीजी घेऊन गेलेल्या कोणत्याही संताने परस्पर अर्थामध्ये बदल करु नये.काहीही बदल करायचा वाटत असल्यास रामद्वारा जळगांवशी संपर्क साधावा व नंतर बदल करावा.

✻ वाणीजी आमच्याकडून जशी पाहिजे तशी चेक झालेली नाही,चेक करायला भरपूर वेळ लागतो.आम्ही परत चेक करुन पुन्हा लोड करुन देऊ.याला वर्षभर तरी लागेल. तुमच्या समजण्यापुरता कामात येईल,यासाठी आम्ही वाणीजी वाचण्याकरीता लोड करुन दिली आहे.

## ।। अथ सुरगुण निरगुण को अंग लिखंते ।।

।। साखी ।।

**सुरगुण निर्गुण सब करे ।। भेद न जाणे कोय ।।**
**सुरगुण मे सुखराम के ।। नकला पूजे लोय ।।१।।**

सर्व लोक उपासना करतात,त्यात कित्येक सगुणाची(साकाराची)आणि कित्येक निर्गुणाची (निराकाराची)उपासना करतात,हे सर्व अस्सल(खरे)सगुण आणि निर्गुणाचा भेद जाणत नाही व नकली सगुण व निर्गुणला पूजतात.।।१।।

**सुरगुण न्यारी रे गई ।। निरगुण लखे न आय ।।**
**सुरगुण की सुखराम के ।। नकला पूजे लाय ।।२।।**

जगातील लोक ज्याला सगुण समजतात,त्यापेक्षा अस्सल(खरा)सर्गुण वेगळा आहे,हे जगातील लोक अस्सल(खरा)सर्गुण पूजत नाही,नक्कल सर्गुण पूजतात,हे जगातील लोक अस्सल(खरा)सर्गुणही जाणत नाही व अस्सल निर्गुणही जाणत नाही,असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज बोलले.।।२।।

**सुरगुण मेई समजे नही ।। ओ जुग सब सेंसार ।।**
**नकलाँ करी सुखरामजी ।। पूजे सबे गिवांर ।।३।।**

सगुणाची भक्ति करणारे संसारातील सर्व लोक अस्सल सगुण जाणत नाही,हे लोक देवतांच्या मूर्ति बनवून पुजतात,असे करणारे सर्व मुर्ख(अनाडी)आहेत.।।३।।

**सुणज्यो रे सेंसार सो ।। समजो ग्यान बिचार ।।**
**सुरगुण की गम किजीये ।। के सुखदेव ऊर धार ।।४।।**

संसारातील सर्व लोक ऐका,मी सांगतो,या सगुण ज्ञान विचाराला समजा,त्याची ओळख करा व समजून ह्दयांत धारण करा.असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज बोलले. ।।४।।

**पाहण तो जड़ थूळ हे ।। ओ सुण सुरगुण नाय ।।**
**सो सुरगुण सुखराम के ।। चित मन बोले माय ।।५।।**

दगडाची मुर्ती तर जड स्थुल आहे,ही काही सगुण नाही आहे,सगुण तर ते आहे, ज्यांच्यात चित्त आणि मन आहे,असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज बोलले.।।५।।

**नकल बणावे थूळ की ।। केहे करता अे होय ।।**
**दोना सूं सुखराम के ।। न्यारी रेगी लोय ।।६।।**

तुम्ही दगडाची मूर्ति बनवून म्हणतात की,हाच परमेश्वर आहे,तर ही दगडाची मुर्ती सगुणही नाही आणि निर्गुणही नाही,मूर्तिची पुजा करणारे सुगण आणि निर्गुण या दोन्ही भक्तिपासून दूर वेगळे आहे.असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज बोलले.।।६।।

सुरगुण पाँचू आतमा ।। निरगुण सबद बिचार ।।
के सुखदेव नर समज रे ।। आ सेवा ऊरधार ।।७।।

सगुण तर पंचभूती आत्मा आहे,सतशब्द हा निर्गुण आहे,पंचभूती आत्मा म्हणजे सतगुरुच्या देहाची भक्ति करणे ही सगुण भक्ति आहे व पंचभूती आत्म्यात म्हणजे सतगुरुच्या देहात जो निर्गुण शब्द बोलतो आहे त्याची भक्ति करणे निर्गुणची भक्ति आहे,आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की,अशाप्रकारे हे सुगण व निर्गुण ह्या दोन्ही भक्ति समजून ह्रदयात धारण करा.असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज बोलले. ।।७।।

सुरगुण माता जाणीये ।। निरगुण पिता होय ।।
के सुखदेव अे अेकठा ।। न्यारा सुण्या न कोय ।।८।।

सगुण भक्ति इच्छा मातेची म्हणजे मायेची व निर्गुण भक्ति पिता ब्रह्मची समजा,आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की,जसे आई-वडिल एकच आहे,तसेच माया ब्रह्मही एकच आहे,या आई-वडिलांना म्हणजे माया ब्रह्मलाही वेगळे ऐकले नाही. ।।८।।

जड़ पुजे सुरगुण कहे ।। सो बेक्या जुग माय ।।
राहा नगर सुखराम के ।। तज ऊबट नर जाय ।।९।।

जड पुजा म्हणजे मुर्तिची पुजा करुन आम्ही सगुण भक्ति करतो,असे सांगतात,ते या संसारात बहकलेले आहे,ते नगराचा रस्ता सोडून उजड वाकड्या तिकड्या रस्त्याने जातात,तसे आहे. ।।९।।

ऊर मे सुरगुण सेव हे ।। निरगुण सबद स्वरूप ।।
या सांभळ सुखराम के ।। पूजो सुरगुण रूप ।।१०।।

ह्रदयात सगुण सेवा आहे आणि शब्द हे निर्गुण स्वरुपी आहे,हे ऐकून सगुण रुपाची सेवा करा. ।।१०।।

पिंडत ग्यानी सांभळो ।। आ सेवा सत होय ।।
सुरगुण निरगुण अेकठी ।। के सुखदेवजी तोय ।।११।।

पंडीत आणि ज्ञानी हे सर्व ऐका,हे मी सांगतो ती सेवा खरी आहे,सगुण आणि निर्गुण हे दोन्ही एकेजागी आहे,असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात. ।।११।।

सुरगुण पूजो आतमा ।। ज्याँ मे सिरजन हार ।।
पाहण तो सुखराम के ।। हे सो थूळ बिचार ।।१२।।

सतगुरुच्या आत्म्याची पूजा करणे,ही सगुण पुजा आहे,या आत्म्यामध्ये म्हणजे संतात परमात्मा राहतो.त्या परमात्म्यावाली आत्म्याची म्हणजे संताची पुजा करा,दगडाची मुर्ति स्थूळ म्हणजे जड आहे,त्याचात परमात्मा राहत नाही,हा विचार करुन घ्या. ।।१२।।

सुरगुण निर्गुण एक हे ।। जे जाणे कोई भेव ।।

सुरगुण कर सुखराम के ।। पावे निरगुण देव ।।१३।।

सगुण आणि निर्गुण एकच आहे,म्हणून सगुण म्हणजे संताचा जवळून निर्गुण देव मिळेल. असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज बोलले. ।।१३।।

सुरगुण सेवा सो सही ।। बोलर दे आसीस ।।
पूज्याँ बोल न जाब दे ।। सो जड़ बिस्वाबीस ।।१४।।

जे संत बोलतात व आशीर्वाद देतात आणि ज्ञान सांगतात अशा संताची सेवा करणे,ही सगुण सेवा आहे,ज्या मूर्तिची पुजा करतात,ती मुर्ती बोलून उत्तर देत नाही,ती मूर्ति बिस्वा बीस म्हणजे सोळा आणे जड आहे. ।।१४।।

राम केहे मुज माँय हे ।। पूजन जड़ कूं जाय ।।
के सुखदेव ग्यानी सुणो ।। न्याव करीजे आय ।।१५।।

सर्व लोक माझ्यात राम आहे,असे म्हणतात आणि असे म्हणणारे,दगडाची मुर्ति पुजायला जातात,तर सर्व ज्ञानी ऐका आणि याचा न्याय करा की,आत्मा हा परमात्मा आहे म्हणजे आत्म्यात परमात्मा आहे,तर दगडाच्या मुर्तीची पुजा का करतात? ।।१५।।

तो में तेरा राम हे ।। तो जड़ पूज्यो काँय ।।
के युँ को सुखराम के ।। हर नही हे हम माय ।।१६।।

तुमच्यातच तुमचा राम आहे,तर दगडाच्या मुर्तिची पुजा का करतात,नाही तर असे म्हणा की माझ्यात राम नाही आहे. ।।१६।।

जे हर तुमरे मांय हे ।। में बूजत हूँ आय ।।
जड़ आगे सुखराम के ।। काँय निवावो जाय ।।१७।।

जर तुमच्यात राम आहे,तर मी विचारतो की,तुमच्यात राम असतांना ही,जड मुर्तिच्या पुढे डोके का झुकवतात.।।१७।।

केता तो तुम यूँ कहो ।। नर नारायण देहे ।।
पूजे जड़ सुखराम क्हे ।। पत्थर सिर पर लेहे ।।१८।।

तुम्ही तर सांगतात की,नर नारायणाचा देह आहे,म्हणजे नर जो आहे तो नारायणाचा देह आहे.तर असे म्हणणारे डोक्यावर दगडाचा मूर्तिला का घेतात?असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज बोलले. ।।१८।।

तुम ठाकुर कर थापीयो ।। अेक तत्त कूं कुवाय ।।
तत पांचूँ सुखराम के ।। ता की गम न काय ।।१९।।

तुम्ही ज्याला ठाकुरजी करुन स्थापित केले आहे,ते फक्त एक तत्व म्हणजे जड पृथ्वी तत्वाचे आहे,परंतु पांच तत्वाचे बनलेले संत आहे,त्याची तुम्हाला माहितीच नाही. ।।१९।।

पांचा मे साहेब बसे ।। केहे सुर नर सब लोय ।।

तत अेके सुखराम के ।। किणी बतायो तोय ।।२०।।

पंचायत परमेश्वर आहे,असे देव आणि मनुष्य सर्व म्हणतात,तर एक तत्व जड म्हणजे पृथ्वी तत्व,दगडाची पुजा करणे,हे तुम्हाला कोणी सांगीतले. ।।२०।।

**में बूजूं तुम पिंडता ।। क्यूँ भरमाई लोय ।।**

**साहिब सो सुखराम के ।। कोहो किण जागां होय ।।२१।।**

अरे पंड्ति,मी तुला विचारतो आहे,या सर्व लोकांना तु का बहकावून दिले?साहेब तू मला कोणत्या जागी आहे हे सांग?(तू मला सांग,साहेब कोणत्या जागी आहे.)असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज बोलले. ।।२१।।

**जे साहिब सब में बसे ।। तो सोजो ऊर मांय ।।**

**के सुखदेव बारे दुनी ।। क्यूँ भटकावो जाय ।।२२।।**

जर सतस्वरुप ब्रह्म म्हणजे साहेब सर्व व्यापक आहे,तर तो सर्वामध्ये बसतो,त्याला तुम्ही आपल्या हृदयातच शोधा,आदि सतगुरु सुखरामजी महाराज पंड्तिांना सांगतात की,तुम्ही या संसारातील लोकांना बाहेर का भटकू देतात. ।।२२।।

**पेट भरण के कारणे ।। भरम उठायो कांय ।।**

**साहिब तो सुखराम के ।। हे सब ही के मांय ।।२३।।**

आदि सतगुरु सुखरामजी महाराज पंडीताला सांगतात की,तुम्ही तुमचे पोट भरण्या–करीता या संसारातील लोकांच्या मनांत भ्रम उठवून म्हणजे बाहेर मूर्तिची पुजा करण्यास का सांगितले?सतस्वरुप साहेब तर सर्व व्यापी आहे आणि सर्वांच्या आंत आहे.तर लोकांना बाहेर मूर्तिची पुजा करण्यात का भटकवले.।।२३।।

**हर का किया देव अे ।। प्रगट पांचूँ जोय ।।**

**तन देवल सुखराम के ।। राम बणाया सोय ।।२४।।**

हरीने बनविलेला देह रुपी देव हे पांच तत्वाचे(आकांश,वायु,अग्नी,जळ,पृथ्वी)प्रगट दिसते,या पांच तत्वापासून बनलेला देवल म्हणजे देह त्या रामानेच बनवलेला आहे. असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज बोलले.।।२४।।

**राम बणाया देवरां ।। तां मे मेल्या देव ।।**

**सुणज्यो सब सुखराम के ।। याँ की करलो सेव ।।२५।।**

रामाचे बनविलेले देह रुपी देवालय आहे,त्याच्यात आत्मा हा देव आहे, तर सर्व लोक ऐका व आत्म्याची सेवा करा.असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज बोलले.।।२५।।

**मन का कीया देवरा ।। मन ही थाप्यो देव ।।**

**बिण समज्या सुखराम के ।। भोळा करसी सेव ।।२६।।**

तुम्ही तुमच्या मनाने दगड ,माती ,चुना ,लाकुड यांचे देऊळ बनविले आणि मनानेच या

देवळांत दगडांच्या देवाची स्थापना केली,परंतु यांच्यात जे समजत नाही आणि जे भोळे आहेत,तेच या मूर्तिची सेवा करतात.असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज बोलले.।।२६।।

सांई देवळ मांडीयो ।। अजब अनोपम आय ।।
तामे सुण सुखराम के ।। तीन लोक सब मांय ।।२७।।

त्या मालकाने देह रुपी देवल उत्पन्न केले,त्याला अजब व अनुपम बनविले.या शरीरातून तीन लोक बनविले.असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज बोलले. ।।२७।।

मन का किया देवरा ।। ओ मन पूजे जोय ।।
तब लग सुण सुखराम के ।। हर सूं बेमुख होय ।।२८।।

मनाने बनविलेले चुना,माती,दगड,लाकडाचा देवळात त्यांचे मनच पुजण्यास जाते,आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की,ते खरे रामजीपासून विमुख आहे. ।।२८।।

हर का कीया देवरा ।। तीन मे सब ही देव ।।
हर वाँही सुखराम के ।। करल्यो वॉकी सेव ।।२९।।

हरीचे बनविलेले देह रुपी देवळात सर्व देव आणि हर ही आहे,अशा संताची सेवा करा.असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज बोलले.।।२९।।

क्हा कहूँ मन गिंवार कूँ ।। समजे नही लगार ।।
के सुखदेव ईण झूट संग ।। क्यूं ऊतरेगो पार ।।३०।।

हे मन मुर्ख आहे,या मनाला काय सांगू?सांगितलेले बिलकुलही समजत नाही,या खोट्या मूर्ति पुजेच्या संगाने पार कसे उतरेल?असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज बोलले. ।।३०।।

सुरगुण काया आपकी ।। निरगुण सिंवरण सार ।।
अे भक्ति सुखराम के ।। दोनू संग बिचार ।।३१।।

सगुण ही आपली काया आहे आणि ज्या सतशब्दाचे स्मरण करतात,तो शब्द निर्गुण आहे,आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की,हे दोन्ही साकार आणि निराकारची भक्ति आपल्या बरोबरच आहे.।।३१।।

प्रममोख जब पावसी ।। हर नित सिंवऱ्याँ जोय ।।
निरगुण संग सुखराम के ।। सुरगुण भेळी होय ।।३२।।

जेव्हा नित्य हरीचे स्मरण कराल,तेव्हा परममोक्ष तुम्हाला मिळेल,संताचा सगुण देहा-पासून निर्गुण शब्द समजून निर्गुण शब्दाचे स्मरण कराल,तेव्हा मोक्ष होईल.असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज बोलले. ।।३२।।

सुरगुण सुण ममंकार हे ।। निरगुण अेहे पिछाण ।।

ररंकार सुखराम के ।। मुख बिन बोले बाण ।।३३।।

रा व म या दोन अक्षरातून म अक्षर हे सगुण आहे,ही ममंकार माया आहे आणि निर्गुण जो ररंकार शब्द मुखाशिवाय आणि जिभेशिवाय रोमा रोमातून बोलला जातो,तो निर्गुण आहे. असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज बोलले. ।।३३।।

जब लग सुरगुण सेव हे ।। मुख सूं सिंवरे कोय ।।
निरगुण तो सुखराम के ।। बिन रसणा सूं होय ।।३४।।

जोपर्यंत तोंडाने स्मरण होते आहे म्हणजे नामाचे उच्चारण होते आहे,तो पर्यंत सगुण भक्ति आहे आणि जिभेशिवाय स्मरण होते ती निर्गुण भक्ति आहे.असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज बोलले.।।३४।।

सुरगुण सेवा आ सही ।। मुख सूं सिंवरे राम ।।
रट रटणा सुखराम के ।। पूंछे निर्गुण धाम ।।३५।।

जे मुखाने रामनामाचे स्मरण करतात,ती सगुण सेवा आहे,या सगुण सेवेने म्हणजे रामनामाचे रटन केल्यानेच निर्गुण धामाला पोहचता येते,रामनामाचे रटण केल्याशिवाय, निर्गुण धामाला कोणीही पोहचत नाही.असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज बोलले. ।।३५।।

सुरगुण निरगुण एक हे ।। सुण ज्यो ईण बिध होय ।।
ओ यो संग सुखराम के ।। मन माना कूं जोय ।।३६।।

सगुण आणि निर्गुण हे दोन्ही एकच आहे,ही विधी सर्व लोक ऐकून घ्या,सगुण आणि निर्गुण हे दोन्ही एक कसे आहे,हे मनाला ज्ञान देवून बघून घ्या.असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज बोलले.।।३६।।

बाहीर पूजे देवरा ।। आ सुरगुण नही होय ।।
भरम्योड़ा सुखराम के ।। नकल बणाई जोय ।।३७।।

बाहेरचे जे देऊळ(मूर्ति)पुजतात ही कोणती सगुण भक्ति नाही आहे,हे भ्रमीत झालेल्या लोकांनी नक्कल(मूर्ति)बनवली आहे आणि तिला पूजतात.असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज बोलले. ।।३७।।

प्रगट हेला देत हूँ ।। सुणज्यो सब नर आय ।।
भक्ति तो सुखराम के ।। हे दोनू तन मांय ।।३८।।

हे मी प्रगट हाक लावून सांगत आहे,तर सर्व लोक येऊन ऐका,आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की,सगुण व निर्गुण ह्या दोन्ही ही भक्ति तर आपल्या देहातच आहे. ।।३८।।

।। इति ।। सगुण निर्गुणच्या अंगाचे भाषांतर संपूर्ण ।।